सन्माननीय पालक बंधू, भगिनी,

सप्रेम नमस्कार,

'पालवी' च्या माध्यमातून आपणाशी संवाद साधतांना विशेष आनंद होत आहे. आपल्या पाल्याच्या शैक्षणिक जडणघडणीसाठी आपण केलेली गुरुकुल बालविकास मंदिराची निवड सार्थ करण्याचा आम्ही सतत प्रयत्न करतो. मुले ही देवाघरची फुले, फुलाप्रमाणे नाजुक मन असणाऱ्या मुलांचा मनोविकास शास्त्रीय पद्धतीने व्हावा याकडे आमचा कटाक्ष असतो. त्यासाठी विविध पुस्तके, शैक्षणिक साहित्य, नोंदवही प्रकल्पपुस्तिका ह्यांचा वापर शिक्षिका करतात. विद्यार्थ्यांसाठी प्रकल्प सादरीकरण करतांना त्यामागचा उद्देश आधी निश्चित केला जातो. जसे, की भाज्यांची फळांची ओळख, जीवनसत्त्वांचे महत्त्व, वृक्षसंवर्धन, स्वच्छता, नीतिमूल्यांची जपणूक इत्यादी, कालानुरुप शिकणे अधिक सोपे व्हावे यासाठी (Power Point Presentation) दृकश्राव्य माध्यमांचा देखील जरुर तेथे वापर केला जातो.

मूल वाढवितांना ते पुढे केवळ आर्थिकदृष्ट्या सक्षम होईल एवढेच न पाहता तो सुसंस्कारित, जबाबदार नागरिक कसा घडेल याकडे आपण जास्त लक्ष दिले पाहिजे. आपला देश अधिक सक्षम होण्यासाठी ही पिढी नियमांचे पालन करणारी, सार्वजनिक स्वच्छता, शांतता, ज्येष्ठांचा आदर व परस्परांप्रती बंधुभाव बाळगणारी असायला हवी. त्यासाठी आपणा सर्वांचे त्यांच्यासमोरील वर्तनावरील उद्दीष्टांना अनुरुप असायला हवे. विद्यार्थ्यांस केवळ पुस्तकी ज्ञान न देता त्याचा मानसिक बौद्धिक व शारीरिक असा सर्वांगीण विकास कसा होईल हे आपण बघितले पाहिजे.

शाळेच्या वाढीसाठी आपण दिलेल्या सर्व सूचनांचा आम्ही आदर करतो. निसर्ग शाळेसाठी उद्यान उपलब्ध करुन देणारी चाळीसगाव, नगरपरिषद, आषाढी दिंडीसाठी परवानगी देणारे श्री स्वामी समर्थ मंदिर ट्रस्ट, स्थळभेटीसाठी परवानगी देणाऱ्या संस्था, मुलांना शाळेत येवून गोष्टी सांगणारे आदरणीय आजीआजोबा, पारितोषिकांचे दाते, संस्थेचे मार्गदर्शक सदस्य, विविध प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून येणारे मान्यवर, त्याचप्रमाणे बहुसंख्य विद्यार्थ्यांची वेळेत व जबाबदारीने ने-आण करणारे रिक्षा चालक बांधव, शाळेच्या अभिनव उपक्रमांना वृत्तपत्रांमधून प्रसिद्धी देणारे पत्रकार बांधव ह्या सर्वांची संस्था ऋणी आहे.

आपणा सर्वांच्या पाल्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी मनापासून शुभेच्छा...!

आपला विश्वासू,

**डॉ. प्रसाद शंकर पाठक**

चेअरमन

गुरुकुल बालविकास मंदिर, चाळीसगाव

सादर नमस्कार,

हसू द्या, खेळू द्या, नाचू द्या, बागडू द्या, त्यांचे त्यांना फुलू दया, त्यांचे त्यांना उमलू द्या. प्रत्येक पालकांना वाटत असते की, आपण आपल्या मुलांसाठी काहीतरी करावं. कारण मुलं आई–वडिलांचे स्वप्न असतं. हे स्वप्न साकार करण्यासाठी असलेले पालकत्व हे 'सुजाण' आहे, अशी जर प्रत्येकाची भूमिका असेल तर पालक म्हणून आपण थोडा विचार करायला हवा. थोडं भूतकाळात डोकावून बघितले तर, आपण स्वत: जेव्हा मुलं होतो तेव्हा आपले आई–वडील किंवा घरातील वडील मंडळी यांचे पालकत्व कसे होते ? याचा प्रत्येकाने विचार करायला हवा. आज माझी आर्थिक स्थिती चांगली आहे, म्हणून मला जे करता आले नाही, ते सर्व माझ्या मुलाला मिळाले पाहिजे, माझे जे स्वप्न अपूर्ण होते ते माझ्या मुलाने पूर्ण केलेच पाहिजे असा निग्रहाचा 'च' आहे तो प्रत्येकाने बदलला पाहिजे. मान्य आहे, आज स्पर्धेचे युग आहे. तेव्हा या जगात टिकायचे असेल तर आपलं मुलं हे अष्टपैलू असलं पाहिजे. प्रत्येकात काहीतरी गुणी असतो. एखाद्याची चित्रकला उत्तम असेल तर एखादा खेळात अव्वल असेल, एखाद्याचे वक्तृत्त्व उत्तम असेल तर कोणी नृत्य छान करत असेल. प्रत्येक मुलातील अभिव्यक्ती ओळखून या सुप्त कलागुणांना प्रोत्साहीत केले तर भविष्यात नक्कीच आपले मुलं हे त्या क्षेत्रात प्रगती करु शकेल.

'आनंददायी शिक्षणाचा' हाच खरा हेतू आहे.

बाळ जेव्हा छोटे असते, तेव्हा आई–वडील हे त्या बाळाला बोलण्यासाठी प्रेरीत करतात. त्यासाठी ते स्वत: मुलं होवून त्यांच्याशी तसे वर्तन करुन बोबडे बोल बोलतात. मुलं रांगायला लागल्यावर पाऊले टाकून चालायला लागल्यावर बाळाला प्रोत्साहित करतात. या शिक्षणात कुठेच धाक दपटशा किंवा जबरदस्ती नसने. अशा वेळी चालतांना मुलं पडलं तरी त्याला चटकन उचलून पुन्हा चालण्यासाठी प्रेरीत केले जाते. पडल्यावर ही मुलं स्वत: हसून नव्याने पावले चालयला लागते. इथे शिकवण्याची व शिकण्याची सक्त दिसून येत नाही. हेच खरे आनंददायी शिक्षण होय. मग हीच भूमिका आपण शिशुला शाळेत घातल्यावर सर्रासपणे का विसरतो ? आपले बालक कोणत्या प्रकारची अभिव्यक्ती करण्यासाठी जन्माला आले आहे, हे आपण कधीच पाहत नाही. बालक आपली नाराजी व्यक्त करते, काही तोडफोड करते किंवा खोटेही बोलते. तेव्हा त्या बालकाला आपल्याला काहीतरी सांगायचे असते. ती बालकाची नाराजी आपण निटपणे जाणून घेतली नाही, तर पुढे पुढे बालकाच्या याच सवयी 'वर्तन समस्येत' परावर्तीत होतात. शारीरिक आरोग्य चांगले असावे. म्हणून आपण जेवढे प्रयत्नशील असतो त्याचप्रमाणे मानसिक आरोग्यही उत्तम असावे. याची दखल आपण घेतली पाहिजे. बालकांच्या विकासात मानसिक विकासाचा अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. आपल्या पाल्याच्या निकोप वाढीसाठी भावनिक विकासासाठी त्याला समजून घेतले पाहिजे. तरच आपले पालकत्व हे सुजाण पालकत्व ठरेल.

येणाऱ्या शैक्षणिक वर्षासाठी गुरुकुल बालविकास मंदिरात विद्यार्थ्यांच्या मानसिक व शारीरिक आरोग्यासाठी समुपदेशक नेमण्याचा आमचा मानस आहे. तसेच 'सुंदर हस्ताक्षर' हे मनाचा आरसा आहे.' त्यासाठी त्याची सुरुवात बालवाडी शिक्षणापासूनच व्हावी या उद्देशाने सुंदर हस्ताक्षर तज्ञांची नेमणूक करण्याचा आमचा मानस आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगण विकासाचे ध्येय नेहमी डोळ्यासमोर ठेवून शिक्षक व संस्थाचालकांचा हा प्रवास सुरु आहे. आत्तापर्यंतच्या सर्वच उपक्रमांना आपले लाभलेले सहकार्य निश्चितच मोलाचे आहे. तसेच यापुढील उपक्रमांनाही आपली साथ मिळावी या सदिच्छेत....!

धन्यवाद...!


**सौ. वैशाली संजय रुईकर,**

**मुख्याध्यापिका– गुरुकुल बालविकास मंदिर, चाळीसगाव**

## - गुरुकुल बालविकास मंदिराची ठळक वैशिष्ट्ये -

- भारतीय परंपरेनुसार विविध सण समारंभ साजरे केले जातात.
- विद्यार्थ्यांना मोफत पोषण मूल्यांवर आधारीत खाऊची योजना.
- भारतीय परंपरेनुसार संस्कारक्षम शिक्षण व ई-लर्निंगद्वारे विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाशी निगडीत शिक्षण.
- विविध स्थळ भेटींचे आयोजन
- आत्मविश्वास व सभाधीटपणा निर्माण होण्यासाठी विविध प्रकल्पाद्वारे आनंददायी शिक्षण.
- आजी-आजोबांच्या प्रेमाला पारखी होत जाणाऱ्या नवीन पिढीचा विचार करुन बालविकास मंदिरात आजी-आजोबांना गोष्ट सांगण्यासाठी आमंत्रित केले जाते.
- पालकांसाठी समुपदेशनपर विविध विषयांवर व्याख्याने.
- समाजातील विविध कामकरी वर्गाचा परिचय होण्यासाठी अनुभव शिक्षण उदा. फळ विक्रेता, दुधवाला, भाजी विक्रेता इ.
- तज्ज्ञ डॉक्टरांमार्फत विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी.
- दर महिन्याला पालक/शिक्षक आंतरक्रिया सभा.
- विविध शालेय स्पर्धा व क्रीडामहोत्सव, सांस्कृतिक कार्यक्रम प्रकल्प सादरीकरणाचे व उपक्रमांचे आयोजन.
- ३५ ते ४० विद्यार्थ्यांमागे १ शिक्षिका व १ मदतनीस.
- शाळेकडून मोफत गणवेश.
- हवेशीर चित्ररुपी वर्गखोल्या.
- भरपूर प्रमाणात खेळ, चित्रकला व कार्यानुभव साहित्य.
- विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह व स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सुविधा.

# – परंपरा सणांची –



## ✻ स्वागत समारंभ ✻

नवे वर्ग, नवे मित्र मैत्रिणी, नवा अभ्यास, नवे शालेय साहित्य घेऊन नवा ध्यास घेत विद्यार्थी आपल्या पालकांच्या मदतीने शाळेत पोहचत होती.

२०१९–२० या शैक्षणिक वर्षातील शाळा सुरु झाली, शाळेचा हा पहिला दिवस चैतन्यमय आणि उत्साहवर्धक व्हावा यासाठी पहिल्याच दिवशी शाळेला फुग्यांनी सुशोभित केले व विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले. नवीन विद्यार्थ्यांसोबत पावसाचेही आगमन झाले. आणि हेच औचित्य साधून विद्यार्थ्यांना 'झाडाचे महत्त्व व उपयोग' समजावा म्हणून दि.५ जुलै रोजी विद्यार्थ्यांचा शाळा प्रवेशोत्सव हा 'ग्रीन डे' 'झाडे लावा, झाडे जगवा' या संदेशाचे शुभेच्छा कार्ड देऊन साजरा करण्यात आला.



## ✻ आषाढी एकादशी ✻

**चल ग सखे चल ग सखे ।**
**पंढरीला । जय हरी विठ्ठल ।**

दिनांक ११/७/२०१९ रोजी आषाढी एकादशीनिमित्त चाळीसगाव येथील श्री स्वामी समर्थ केंद्र येथे दिंडीचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये विद्यार्थी हे वारकरी संप्रदायाला अनुसरुन वेशभुषा करुन आले होते. सजवलेली विठ्ठलाची पालखी विद्यार्थ्यांच्या खांद्यावर देऊन पालखी परिक्रमा करण्यात आली. सर्व संतांच्या नामाचा देखील जयघोष करण्यात आला. व त्यानंतर काही भजने सादर करून वारीची सांगता झाली.




## ✻ गुरुपौर्णिमा ✻

आषाढ पौर्णिमेस गुरुपौर्णिमा किंवा व्यासपौर्णिमा असे म्हणतात. या दिवशी व्यासपूजा करण्याची प्रथा आहे. व्यक्तीला जीवनात मार्गदर्शन करणाऱ्या गुरुंचे पूजन या दिवशी केले जाते. बालविकास मंदिरामध्ये 'आई' हा आपला पहिला गुरु या संकल्पेनुसार दि.१६/७/२०१९ रोजी विद्यार्थ्यांकडून माता–पित्यांचे पाद्यपूजन करुन एक आगळी वेगळी गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली.



## * दीपपूजन *

प्रकाशाचे रुप दिवा तर प्रकाश म्हणजेच ज्ञान आणि ईश्वराकडून ज्ञान मिळावे म्हणून दीप–पूजनाचे प्रयोजन दि.१३/८/२०१९ रोजी मंदिरात हा सण साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी घरुन विविध प्रकारचे दिवे आणून, त्यांची मांडणी करुन सभोवताली रांगोळी काढून शुभम् करोती म्हणून दीपपूजन साजरे केले व त्यानंतर सर्व दिव्यांची माहिती सांगून दिव्यांच्या अमावस्येची गोष्ट सांगितली.



## * रक्षाबंधन *

हळव्या नात्यांच्या धाग्यावर हळूवार उमलणारे स्पंदन आहे. रक्षाबंधन रक्षाबंधन हा सण भाऊ–बहिणीच्या स्नेह आणि पवित्र नात्याचा उत्सव आहे. दि.१३/८/२०१९ रोजी बालविकास मंदिरात विद्यार्थी व विद्यार्थीनींनी एकमेकांना राखी बांधून, भेटवस्तू देऊन आनंदाने साजरा करण्यात आला.



## * दहिहंडी *

''दह्यात साखर, साखरेत भात, दहिहंडी उभी करुया देऊया एकमेकांना साथ...'' श्रावण महिन्यातील अष्टमीला सर्वत्र कृष्ण जन्माष्टमी साजरी केली जाते. कृष्णाला दही, तूप, लोणी खूप आवडत असे तो आपल्या मित्रांच्या सहाय्याने वर चढून या हंडीपर्यंत पोहचायचा बालविकास मंदिरात हा सण २३/८/२०१९ रोजी सर्व विद्यार्थी राधा व कृष्ण या वेशभूषेत येऊन साजरा केला. शिक्षकांनी दहीहंडी सजवली. पालक, शिक्षकांनी हंडीचे पूजन केले. व बालगोपाळांनी गोविंदा रे गोपाळा या गजरात दहीहंडी फोडली व यातून सर्वांनी एकत्र येवून लक्ष साध्य करणे हा संदेश दिला.

## * रंगोत्सव *



नवरात्र हा देवीचा उत्सव, नवरात्रीचे नऊ दिवस व नऊ रंग असतात. या नऊ दिवसात विद्द्यार्थ्यांना हसत खेळत रंगाचे ज्ञान देऊन त्याचबरोबर या नऊ दिवसात एकता व समानता दिसावी म्हणून गुरुकुल बालविकास मंदिरात नवरात्र निमित्त 'रंगोत्सव' साजरा करण्यात आला.



## भोंडला

**एक लिंब झेलू बाई, दोन लिंब झेलू**
**दोन लिंब झेलू बाई, तीन लिंब झेलू**

आपला भारत देश संस्कृती प्रधान आहेच त्याचबरोबर कृषी प्रधानही आहे. पर्जन्यकाळात शक्ती आणि तिच्या प्रतिकांची पूजा करणारी ही भारतीय संस्कृती. हस्त नक्षत्र या पर्जन्य काळातले शेवटचे नक्षत्र. आपल्या संस्कृतीत हत्ती हे मेघाचे प्रतिक दि.४/१०/२०१९ रोजी बालविकास मंदिरात हत्तीची पूजा करुन सगळ्यांनी मिळून भोंडला व भुलाबाईची वेगवेगळी गाणी म्हणून फेर धरले. त्यानंतर खाऊ ओळखण्याचा मनमुराद आनंद विद्यार्थ्यांना घेता आला व खाऊ वाटप करुन कार्यक्रमाची सांगता झाली.




## * दीपोत्सव *

सुरक्षित आणि प्रदूषणमुक्त दिवाळी साजरी करा आणि प्रकृतीची (निसर्गाची) सुरक्षितता वाढवा.

दीपावली प्रकाशाचा सण आहे. दीप हा मांगल्याचा प्रतिक आहे. आपल्या जीवनातील अंधकार दूर व्हावा म्हणून सर्वजण हा सण साजरा करतात दि.१९/१०/२०१९ रोजी बालविकास मंदिरात दीपपूजन, लक्ष्मीपूजन व सरस्वतीपूजन करुन त्यानंतर दिवाळी फराळ व भेटवस्तूचे वाटप करुन हा सण साजरा करण्यात आला. या दिवशी मोठ्या शिशु वर्गाची रांगोळी स्पर्धा आयोजित केली. दिवाळीच्या पाच दिवसांचे महत्त्व सांगून दिवाळीत फटाक्यांमुळे पर्यावरणावर होणारे दुष्परिणाम सांगून एक आगळी वेगळी फटाके विरहीत दिवाळी बालविकास मंदिरात साजरी केली गेली.




## * रंगपंचमी *

**रंगपंचमीचे रंग जणू ,एकमेकांच्या रंगात रंगतात**
**असूनही वेगळे रंगानी रंग स्वत:चा विसरुनी,**
**एकीचे महत्त्व सांगतात.**

रंगपंचमी हा सण दि.१३/३/२०१९ रोजी शाळेत साजरा करण्यात आला. या दिवशी नैसर्गिकरित्या तयार करण्यात आलेले रंग मुलांना देऊन व लावून हा सण साजरा केला व या निमित्ताने मुलांना देखील वेगवेगळे रंग खेळ्याची मजा लुटता आली.

# – सहशालेय उपक्रम –

## * अभ्यासनाट्य (प्रकल्प सादरीकरण) *

अभ्यासनाट्य म्हणजे अभ्यासाच्या विषयावर शिक्षकांनी छोटीशी नाटिका लिहून ती विद्यार्थ्यांकडून वर्गातच सादर करुन घेणे.

सर्वसामान्ये विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास व्हावा, कला विषयांची अभिव्यक्ती निर्माण व्हावी व अभ्यास आनंददायी व्हावा यासाठी अभ्यासनाट्य म्हणजेच 'प्रकल्प सादरीकरण' केले गेले. यावर्षी खालील विषय हाताळण्यात आले.

**छोटा शिशु गट**

१) वारांचा महिमा
२) मराठी महिन्यांचे महत्त्व
३) स्वच्छतेकडून समृद्धीकडे
४) झाडे लावा, झाडे जगवा
५) जंगली प्राण्यांची ओळख
६) पाळीव प्राण्यांची ओळख व गरज
७) फळांची ओळख व गरज
८) भाज्यांची ओळख व महत्त्व

**मोठा शिशु गट**

१) मजा मराठी मुळाक्षरांची
२) मजा मराठी अंकांची
३) हात धुवा रोग टाळा (Handwash)
४) स्वस्थ रहा, मस्त रहा (जीवनसत्व)
५) कामकरी वर्ग परिचय
६) Opposite Words & Action Song.
७) झाडांची वाढ
८) स्वागत नव्या युगाचे

## * कामकरी वर्ग परिचय :

**(आपली माणसं)**

विद्यार्थी जे ऐकतात, बघतात त्याहीपेक्षा ते जे स्वत: करुन बघतात ती गोष्ट प्रत्यक्ष कृतीद्वारा केल्यामुळे अधिक आत्मसात करतात.

म्हणूनच कामकरी वर्ग परिचयाच्या अंतर्गत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी शाळेतच भाजीवाला फळवाला यांना आमंत्रित करण्यात येते. फळ व भाजी विकत घेण्याचा प्रत्यक्ष अनुभव देण्यात येतो.

यावर्षी भाजीवाला यांना आमंत्रित करण्यात आले होते.

## * आजी-आजोबांची गोष्ट :

**नातवंड म्हणजे काय चीज असते**
**आजी आजोबांमध्ये दडलेले सँडवीच असते**
**नातवंड म्हणजे त्रिवेणी संगम**

**तिसऱ्या पिढीचा असतो उगम**
**नातवंड म्हणजे आनंद तरंग**
**आनंदाच्या डोहात डुंबते अंतरंग**

खरंच प्रत्येकच, आजी–आजोबांना असेच वाटते म्हणूनच या अंतर्गत आजी–आजोबांच्या प्रेमाला पारखी होत जाणारी नविन पिढीचा विचार करुन बालविकास मंदिरात दर महिन्यातून एकदा भाजी किंवा आजोबांना आमंत्रित केले जाते. यावर्षी आमंत्रित आजी–आजोबांची नावे –

१) श्री. अशोक पुंजू शिंपी
२) सौ. कमल अशोक शिंपी
३) सौ. सोनाली गोकुळ वाघ
४) सौ. कविता योगेश निकम
५) श्री. प्रकाश वाबळे सर

## * क्षेत्र भेट :

या अंतर्गत यावर्षी विद्यार्थ्यांनी 'अग्निशमन दल' येथे जाऊन त्यांचे कार्य कसे चालते हे जाणून घेतले.

## * निसर्ग शाळा :

अडीच हजार वर्षांपूर्वी प्लेटोने बालशिक्षणाबद्दल आपले मत मांडले, त्यात बालकांना घराबाहेर नेऊन शिकवावे असे म्हटले आहे. त्यानुसार आम्ही मुलांना बाहेर निसर्गात घेऊन गेलो. चार ते पाच शनिवार 'सुवर्णाताई उद्यान' येथे शाळा भरविण्यात आली. प्रत्येक शनिवारी वेगळ्या प्रकारचे शिक्षण अनुभव विद्यार्थ्यांना देण्यात आले. जसे निसर्गाशी मैत्री म्हणजेच झाडांची ओळख, प्राण्यांची गोष्ट, विविध व्यायाम प्रकार, खेळ आणि आजोबांशी हितगुज आणि वनभोजनाचा आनंद देखील मुलांनी या निसर्गशाळेत अनुभवला.

## * कार्यशाळा पालकांसाठी :

दि.०२/१०/२०१९ रोजी गुरुकुल बालविकास मंदिरमध्ये पालकांसाठी 'पालकत्व तुमचे आमचे' या विषयावर सौ. वृषाली व्यवहारे (समुपदेशक) यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळेचे आयोजन पालकांसाठी करण्यात आले होते.

## * आरोग्य तपासणी :

बालविकास मंदिरात दरवर्षी आरोग्य तपासणी केली जाते. त्यासाठी विविध शाखांमधील तज्ञ डॉक्टरांना आमंत्रित करुन विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात येते

## * ई–लर्निंगद्वारे शिक्षण व पी. पी. टी. (पॉवर पाईंट प्रेझेंटेशन) :

शाळेचे प्रशासन अधिक गतिमान व पारदर्शी होण्यासाठी पालक व विद्यार्थी यांच्याशी मोबाईल ॲप मेसेजद्वारे थेट संपर्क ठेवण्यासाठी व पाल्याची अचूक माहिती पालकांपर्यंत पोहचवण्याकरीता संस्थेने डिजीटल इंडिया हे तत्त्व स्वीकारुन आधुनिक कंप्युटर सिस्टीम मोबाईल ॲप्लीकेशन वेबसाइट यांच्या एकत्रित माध्यमातून पालकांना ई सेवा देणारी आपली शाळा ही इतरांच्या अग्रस्थानी आहे.

या आधीच आम्ही व्हाटस्ॲपद्वारे पालकांना शाळेतील सूचना प्रकल्पांविषयी माहिती, परीक्षेचे वेळापत्रक विविध कार्यक्रमांविषयी माहिती व फोटोग्राप्स देण्यास सुरुवात केली आहे.

## * पी. टी. आय (पालक शिक्षक आंतरक्रिया) :

पालकांना आपल्या पाल्याची दर महिन्याला मूल्यमापनात्मक प्रगती कळावी म्हणून पालक–शिक्षक आंतरक्रिया सभा घेण्यात येते.

## * आनंददायी अनुभव शिक्षण :

बालशिक्षणतज्ज्ञ माँटेसरी बाई यांच्या विचारांनुसार बालकांच्या आयुष्यात अडीच ते सहा वर्षे हा काळ अतिशय संवेदनशील असतो. या काळात आपण त्यांना योग्य ते संस्कार देऊन घडवू शकतो.

विद्यार्थ्यांवर फक्त अभ्यासाचे ओझे न लादता त्यांना समजून घेत कला, खेळ, प्रत्यक्ष कृती असे शिक्षण मुलांना गुरुकूल मध्ये देण्याचा प्रयत्न केला जातो.

प्रत्येक उपक्रम जसे अक्षरांपासून चित्र तयार करणे, कडधान्ये वेगवेगळ्या आकाराच्या चित्रांवर चिटकवणे, मातीपासून वेगवेगळ्या फळभाज्या व वस्तू बनविणे कागदाचे तुकडे फाडणे व ते विशिष्ट आकारात चिटकवणे, शाडू मातीपासून गणपती बनविणे, मऊ व खरखरीत हा फरक समजण्यासाठी कापूस वेलवेट पेपर, पोत्याचा तुकडा व सँडपेपर यांचा प्रत्यक्ष अनुभव देऊन उपक्रम वहीवर चिटकविण्यात आले. असे अनेक उपक्रम विद्यार्थी पालक व शिक्षक यांच्या समन्वयातून विद्यार्थ्यांना शिकविण्यात आले.

तसेच शाळेत भाजी निवडणे, धान्य निवडणे, सुईत दोरा ओवून हार बनविणे, कुटणे, किसणे अशा क्रिया तर, प्रत्यक्ष बी पेरुन झाडं लावणे ह्या क्रिया विद्यार्थ्यांकडून करुन घेतल्या जातात. यातूनच त्यांच्या पंचेद्रियाचा विकास होतो. प्रत्येक उपक्रम कृतीत करीत असल्याने सर्व गोष्टी कायम स्मरणात राहतात. बालकांमधील बदल पालक येऊन सांगतात, मुलांमध्ये होणारा बदल म्हणजेच विकासाला सक्रिय मदत करणे हेच त्यांचे शिक्षण होय.

प्रत्यक्ष अनुभवातून आनंददायी शिक्षण गुरुकुल बालविकास मंदिरात दिले जाते असे अभिप्राय पालकांकडून ऐकावयास मिळतात.

## * कला प्रदर्शन :

गुरुकुल बालविकास मंदिरात लहान व मोठ्या शिशु वर्गातील मुलांनी शिक्षकांच्या व पालकांच्या मदतीने तयार केलेल्या कलाकृतींचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्‌घाटन मा.श्री.आदित्यदादा घाटे, मा. श्री. डॉ. प्रसाद पाठक, मा.श्रीमती सुनीताताई घाटे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी स्वत: रंगवलेले चित्र, हस्तकलेच्या विविध वस्तू, काडी पेटीच्या सहाय्याने बनवलेले वॉलपीस, ग्रिटींग कार्ड, कटिंग पेस्टिंग कोलाज काम, विविध कागदी वस्तू, शोपीस अशा विविध वस्तू आणि मातीपासून विविध फळांचे आकार मांडले होते व ते पाहण्यासाठी सर्वांना खुले करण्यात आले.

## * स्नेहसंमेलन :

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी स्नेहसंमेलन घेण्यात आले. ज्यात ''नृत्याविष्कार (रंग भारताचे)'' या संकल्पनेनुसार केरळ, काश्मीर, राजस्थान, कोकण, महाराष्ट्र इत्यादी विविध राज्यांच्या परंपरेनुसार वेगवेगळी नृत्य सादर करण्यात आली.

सर्व विद्यार्थ्यांनी विविध पोषाख परिधान करुन आपापली नृत्य सादर केली आणि पालकांनी कार्यक्रमास उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद लुटला.

## * ग्रंथालय :

ग्रंथालय - एक सामाजिक संस्था आहे. जिथे ज्ञानप्राप्तीची सर्व प्रमुख साधने-पुस्तके दृकश्राव्य साधने यांचा संग्रह असतो. आधुनिक ज्ञानाच्या विस्फोट युगात फक्त पाठ्यपुस्तकांमधून विद्यार्थ्यांना सर्व प्रकारचे ज्ञान मिळणे शक्य नाही. म्हणून शिक्षकांसोबतच ग्रंथरुपी गुरुंची आवश्यकता असते. शिक्षणाच्या उद्दिष्टांना साध्य करण्यासाठी गुरुकुल बालविकास मंदिरचे ग्रंथालयही असेच विकासाच्या टप्प्यावर आहे.

## * क्रीडा महोत्सव :

जीवनामध्ये खेळाला सुद्धा तितकेच महत्त्व आहे जितके शिक्षणाला महत्त्व आहे. कारण शारीरिक क्षमतेबरोबरच व्यक्तीतील इतर महत्त्वाच्या गुणांचा विकास खेळामुळे घडतो. बहुतेक लोक खेळाकडे मनोरंजन व शारीरिक व्यायाम या दृष्टीकोनातून पाहतात. खरे पाहता खेळामुळे

व्यक्तितील इतर सुप्त गुण सुद्धा विकसीत होत असतात. म्हणूनच व्यक्तिमत्व विकासात शारीरिक क्षमता वाढवतांना खेळाला महत्त्व दिले पाहिजे. खेळामुळे खिलाडू वृत्ती, सांघिक वृत्ती, सहकार्य करण्याची वृत्ती, नेतृत्त्व, स्पर्धात्मक वृत्ती, एकाग्रता, सहनशिलता, आत्मविश्वास या गुणांचा विकास होतो.

एकाग्रतेने आणि परिणामकारक अभ्यास होण्यासाठी खेळ मदत करतो. तेव्हा अभ्यास विरुद्ध खेळ असं समीकरण नसून अभ्यास आणि खेळ हातात हात घालूनच गेले पाहिजेत. हे समजावं म्हणून क्रीडामहोत्सव शाळेत घेण्यात येतो.

## * सहशालेय स्पर्धा *

### छोटा शिशु

*** धावणे**

चि. मृण्यम सचिन वाघ – प्रथम
चि. अथर्व नितीन गवारे – प्रथम
चि. केशव प्रसाद जाट – द्वितीय
चि. मनिष स्वप्निल गढरी – द्वितीय
चि. आदित्य केशव जाट – तृतीय
चि. केतन किरण देशमुख – तृतीय

*** ठोकळा उचलणे**

चि. मृण्मय सचिन वाघ – प्रथम
चि. हर्षल कैलास अहिरे – प्रथम
चि. केशव प्रसाद जाट – द्वितीय
चि. गिरीष योगेश पाटील – द्वितीय
कु. भाविका उदय पाटील – तृतीय
चि. अथर्व नितीन गवारे – तृतीय

*** बादलीत बॉल टाकणे**

कु. पियुषा निलेश चव्हाण – प्रथम
कु. आदिती गणेश पाटील – प्रथम
चि. प्रणव अनिल पाटील – द्वितीय
चि. हर्षल कैलास अहिरराव – द्वितीय
चि. सोहम समाधान वाघ – तृतीय
चि. मनिष स्वप्नील गढरी – तृतीय

### मोठा शिशु

*** अडथळा**

पुष्कराज गणेश देशमुख – प्रथम
चि. ऋषीकेश कमलाकर शिनकर–प्रथम
चि. अपूर्व बाबासाहेब – द्वितीय
चि. जान्हवी प्रकाश पाटील – द्वितीय
चि. सिद्धी कंचन राणा – तृतीय
चि. अमेय दिलीप मोरे – तृतीय

*** चमचा लिंबू**

चि. मानस सुदर्शन पाटील– प्रथम
कु. आर्या प्रदिप पाटील – प्रथम
कु. कादंबरी शरद पाटील – द्वितीय
चि. रविश गोकुळ वाघ – द्वितीय
कु. शुभ्रा विलास पाटील – तृतीय
चि. रियांशु प्रशांत पाटील – तृतीय

*** संगीत खूर्ची**

चि. रियांशु प्रशांत पाटील – प्रथम
कु. तनुजा सतिश वाघ – प्रथम
कु. हर्षदा गणेश घोरपडे – द्वितीय
चि. राघव किरणसिंग पवार – द्वितीय
कु. स्नेहल समाधान वाघ – तृतीय
चि. मानस सुदर्शन पाटील – तृतीय

छोटा शिशु

* बाटलीत पाणी भरणे – १ मिनिट स्पर्धा –

कु. भाविका उदय पाटील – प्रथम
चि. केतन किरण देशमुख – प्रथम
चि. मृण्मय सचिन वाघ – द्वितीय
कु. भाग्यश्री तुकाराम वेल्हे – द्वितीय
चि. सार्थ नरेश निकुंभ – तृतीय
चि. मनिष स्वप्निल गढरी – तृतीय

* वर्तमान पत्राचा चेंडू बनविणे

चि. जय नितीन देशमुख – प्रथम
कु. तन्वी बिभीषण सांगळे – प्रथम
चि. सार्थ नरेश निकुंभ, द्वितीय
चि. केतन किरण देशमुख – द्वितीय
कु. हेतल गणेश अग्रवाल – तृतीय
चि. गिरीष योगेश पाटील – तृतीय

* पूजा साहित्याची नावे सांगणे

चि. जय नितीन देशमुख – प्रथम
चि. शिवतेज संदिप कुंटे – प्रथम
चि. सार्थ नरेश निकुंभ, द्वितीय
चि. स्वरीत वैभव अमृतकर – द्वितीय
कु. हेतल गणेश अग्रवाल – तृतीय
कु. भाग्यश्री तुकाराम वेल्हे – तृतीय

* पुस्तक डोक्यावर ठेवून चालणे

कु. हेतल गणेश अग्रवाल – प्रथम
चि. वेदांत देवेंद्र देशमुख – प्रथम
चि. कृष्णा कमलेश कायस्थ – द्वितीय
चि. रणविर प्रविण संगेले – द्वितीय
चि. विराट दिलीप राजपूत – तृतीय
कु. चेतना योगेश पाटील – तृतीय

मोठा शिशु

चि. पुष्कर सुनिल राजपूत – प्रथम
चि. विरेश महेशभाई – प्रथम
चि. पुष्कराज गणेश देशमुख – द्वितीय
चि. वरद विजय मराठे – द्वितीय
चि. मानस सुदर्शन पाटील – तृतीय
चि. रियांशु प्रशांत पाटील – तृतीय

* फुलांची नावे सांगणे

कु. कादंबरी शरद पाटील–प्रथम
कु. जान्हवी प्रकाश पाटील – प्रथम
कु. मानवी ज्ञानेश्वर पाटील–द्वितीय
कु. गोजिरी सुमित जगताप – द्वितीय
कु. आरुषी दीपक शिर्के – तृतीय
कु. चेतना योगेश निकम – तृतीय

* वाद्यांची नावे सांगणे

कु. कादंबरी शरद पाटील–प्रथम
चि. रविश गोकुळ वाघ – प्रथम
कु. रितिषा चेतन पाटील – द्वितीय
कु. हर्षदा गणेश घोरपडे – द्वितीय
चि. प्रणव ज्ञानेश्वर अमृतकार– तृतीय
कु. आर्या प्रदिप पाटील – तृतीय

* माती पासून गणपती बनविणे

चि. राघव किरणसिंग पवार – प्रथम
चि. दिगंबर रजनीकांत पाटील – प्रथम
कु. रितिषा चेतन पाटील – द्वितीय
चि. वरद विजय मराठे – द्वितीय
कु. कादंबरी शरद पाटील – तृतीय
कु. स्नेहल समाधान पाटील – तृतीय

छोटा शिशु –

*** फुलांचा हार तयार करणे**

चि. सार्थ नरेश निकुंभ – प्रथम
चि. मोहन ज्ञानेश्वर माळी – प्रथम
चि. गौरव गणेश चौधरी – द्वितीय
चि. अथर्व नितिन गवारे – द्वितीय
चि. पूर्वी पुरुषोत्तम पाटील – तृतीय
चि. भूमिका निलेश पाटील – तृतीय

*** देशभक्तीपर गीत गायन**

चि. मौक्षम ज्ञानेश्वर शिंदे – प्रथम
चि. शिवतेज संदिप कुंटे – प्रथम
चि. सार्थ नरेश निकुंभ – द्वितीय
चि. भाग्यश्री तुकाराम वेल्हे – द्वितीय
चि. विराज भाऊसाहेब कचवे – तृतीय
चि. अपूर्व नितीन शेटे – तृतीय

*** मनाचे श्लोक पाठांतर**

चि. सोहम समाधान वाघ – प्रथम
कु. तन्वी बिभिषण सांगळे – प्रथम
कु. स्वरा अनिल पाटील– द्वितीय
चि. कनक प्रफुल्ल पाटील – द्वितीय
चि. गौरव गणेश चौधरी – द्वितीय
चि. अथर्व प्रदिप राजपूत – तृतीय
चि. मनिष स्वप्निल गढरी – तृतीय

*** विविध वेशभुषा स्पर्धा**

चि. विराज भाऊसाहेब कचवे – प्रथम
कु. भाग्यश्री तुकाराम वेल्हे – प्रथम
कु. हेतल गणेश अग्रवाल – द्वितीय

मोठा शिशु

*** रांगोळी काढणे**

कु. कादंबरी शरद पाटील – प्रथम
कु. भुमिका गोकुळ राजपूत – प्रथम
कु. दिव्या विलास देवरे – द्वितीय
चि. ऋषिकेश कमलाकर शिनकर – द्वितीय
चि. अथर्व पुरुषोत्तम निकम – तृतीय
कु. आरती मुकेश चौधरी – तृतीय
कु. चेतना योगेश निकम – तृतीय

*** देशभक्तीपर गीत गायन**

कु. शुभ्रा विलास पाटील – प्रथम
चि. विरेश महेश भोई – प्रथम
चि. मानस सुदर्शन पाटील – द्वितीय
चि. दुर्वेश प्रशांत ठाकूर – द्वितीय
चि. रितिषा चेतन पाटील – तृतीय
कु. हर्षदा गणेश घोरपडे – तृतीय

*** मारोती स्तोत्र पाठांतर**

कु. कादंबरी शरद पाटील, प्रथम
चि. रियांशु प्रशांत पाटील – प्रथम
कु. रितीषा चेतन पाटील – द्वितीय
चि. अजिंक्य वैभव कुलकर्णी – द्वितीय
चि. शाश्वत मिलिंद पाटील – तृतीय
चि. अद्वय संदिप साळुंखे – तृतीय

*** विविध वेशभुषा स्पर्धा**

कु. वैष्णवी जगदीप परदेशी – प्रथम
चि. रविश गोकुळ वाघ – प्रथम
कु. सिद्धी मयुर अमृतकार – द्वितीय

| छोटा शिशु – | मोठा शिशु |
|---|---|
| चि. शिवतेज संदिप कुंटे – द्वितीय | चि. विरेश महेश भाई – द्वितीय |
| चि. सार्थ नरेश निकुंभ – तृतीय | कु. सिद्धी कंचन राणा – तृतीय |
| कु. भूमिका निलेश पाटील – तृतीय | चि. वरद विजय मराठे – तृतीय |
| *** कलाप्रदर्शन** | *** कला प्रदर्शन** |
| कु. स्वरा अनिल पाटील – प्रथम –रंगकाम | कु. चार्वी भूषण कोठावदे–प्रथम (रंगकाम) |
| कु. हेतल गणेश अग्रवाल – प्रथम–मातीकाम | चि. राघव किरणसिंग पवार–प्रथम–हस्तकला |
| कु. वेदिका भूषण विसपुते–प्रथम–कार्यानुभव | कु. लावण्या सतिश पाटील–प्रथम–मातीकाम |
| चि. मनिष स्वप्नील गढरी–प्रथम–चित्रकला | कु. ईश्वरी गोरख कुमावत – प्रथम–रंगकाम |
| कु. आदिती गणेश पाटील–प्रथम–मातीकाम | चि. अमेय दिलीप मोरे – प्रथम –हस्तकला |
| चि. स्वरीत वैभव अमृतकर–प्रथम–हस्तकला | चि. निलेश प्रमोद पाटील – प्रथम–मातीकाम |

**सभाधीटपणा व अभिनय**

| छोटा शिशु – | मोठा शिशु |
|---|---|
| कु. निशा कैलास पाटील | १) कु. दिनेशा समाधान पाटील |
| चि. गिरीष योगेश पाटील | २) कु. लोरी गोकुळ राठोड |
| कु. प्रांजल प्रदिप काळे | १) कु. स्वराली दिपक पाटील |
| चि. मृण्यय सचिन वाघ | २) कु. जीविका विशाल अहिरे |

**शाळाबाह्य अवांतर स्पर्धा –**

**नवनीत मास्टर स्टोक रंगभरण स्पर्धा – सहभाग**

चि. जयेश राकेश बर्गे    चि. मौक्षम ज्ञानेश्वर शिंदे

**सिक्थ एलीमेंटस सेंटर ऑफ आर्ट पुणे आयोजित रंगभरण स्पर्धा**

कु. आर्या प्रदिप पाटील – सुवर्णपदक

चि. जिविका विशाल अहिरे – रौप्य पदक

चि. गौरव गणेश चौधरी – कास्य पदक

*** बक्षीस समारंभ –**

गुरुकुल बालविकास मंदिरात वार्षिक पारितोषिक समारंभ साजरा केला जातो. बक्षीस पात्र विद्यार्थ्यांव्यतिरिक्त सर्व स्पर्धेत, सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना देखील बक्षीस देण्यात येते. त्यामुळे मुलांचे प्रोत्साहन वाढते व मुलांचा आनंद द्विगुणीत होतो.

दि. २७/२/२०२० रोजी बालवाडीचा वार्षिक पारितोषिक समारंभ घेण्यात आला. वर्षभरात घेतलेल्या स्पर्धांमधून विजयी झालेल्या स्पर्धकांना या दिवशी मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. तसेच स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व स्पर्धकांनाही बक्षिसे देण्यात आली.

बालवाडीला अनेक दात्यांनी बक्षीस निधी रक्कम भेट स्वरुपात दिली आहे.

काही बक्षिसे या रक्कमेच्या येणाऱ्या व्याजातून दरवर्षी विजयी स्पर्धकांना बक्षिसे दिली जातात. यावर्षीचे असे दाते पुढील प्रमाणे –

१) सौ. श्रद्धा विश्वास देशपांडे यांचेकडून ५००/– रुपये

२) स्नेहसंमेलन नृत्यविष्कारासाठी श्रीयुत राजेंद्र कटारीया यांचेकडून ४०१/– रुपये

*** उत्कृष्ट विद्यार्थी पुरस्कार –**

प्रत्येक वर्षी उत्कंठा शिगेला पोहचवणारा आणि प्रत्येक विद्यार्थ्याला हवा हवासा वाटणारा पुरस्कार म्हणजे उत्कृष्ट विद्यार्थी पुरस्कार या पुरस्कारासाठी विद्यार्थी निवडतांना त्याचा /तिचा आत्मविश्वास सर्व स्पर्धा व उपक्रमांमध्ये नोंदवलेला सहभाग शिस्तीचे पालन, हजेरी, प्रमाण, अभ्यासातील यश व पाठांतर या सर्व गुणांचा विचार करुन हा पुरस्कार देण्यात येतो.

शैक्षणिक वर्ष २०१९ – २० या वर्षाचा उत्कृष्ट विद्यार्थी पुरस्कार कु. रियांशू प्रशांत पाटील या विद्यार्थीनीस देण्यात आला.

## ऋणनिर्देश

वर्षभरात विविध शालेय व सहशालेय उपक्रम राबवितांना अनेकांचे अनमोल सहकार्य लाभले. पालक हितचिंतक व संस्थेचे पदाधिकारी यांनी वेळावेळी सहकार्य केले. तसेच पालक वर्गाचाही सक्रीय सहभाग होता. तसेच या अंकाचे अक्षर शुद्धलेखन तपासणीकामी व शब्दरचनेसाठी श्री. अभय प्रभाकर देवरे, शिक्षक व मुखपृष्ठ तयार करणेकामी श्री. अमोल सुभाष येवले, शिक्षक ता. सा. मा. वि. चाळीसगाव यांची अनमोल मदत झाली. त्याबद्दल या सर्वांचे ऋणी राहून भविष्यातही अशाच सहकार्याची अपेक्षा व्यक्त करते. धन्यवाद !

सौ. वैशाली संजय रुईकर
मुख्याध्यापक
गुरुकुल बालविकास मंदिर, चाळीसगाव

## * अभिप्राय *

आज दिनांक १५ फेब्रुवारी २०२० रोजी गुरुकूल बालविकास मंदिरात येवून शिक्षिका व विद्यार्थी बालक यांचेशी सुसंवाद साधला. बालकांना कथा कथनाचा आनंद दिला व त्यांच्याकडून आनंद मिळविला, लहानपण आठवलंय, निरागस मुले, चुणचुणीत मुले, शिस्तबद्ध मुलं, ह्यांच्यावर सुसंस्कार करणाऱ्या व आपल्या मुलांसारख्या जीव लावणाऱ्या शिक्षिका पाहून बालविकास केंद्राचे काम अतिशय चांगले वाटले, सर्व शिक्षिका व बालकांना खूप खूप शैक्षणिक शुभेच्छा...!

**श्री. शिवाजीराव पाटील**
**(सेवानिवृत्त जि.प.शिक्षणाधिकारी,जळगाव)**

---

माझा पाल्य ज्युनिअर चा गुरुकुल शाळेचा विद्यार्थी आहे. या शाळेबद्दल माझं मत मांडतांना मला मनस्वी आनंद होत आहे. येथे मुलांना आनंददायी वातावरण संस्कारयुक्त शिस्तीचे वातावरण दिले जाते. शिक्षणही नविन सुधारित पद्धतीने दिले जाते. मुलांचा कृतीयुक्त सहभाग घेतला जातो. सर्व विषयांचे ज्ञान त्यांच्या पातळीवर जाऊन दिले जाते. अवांतर विषय, स्पर्धा याबद्दलही मुलांना माहिती मिळते. तरीही मुलांना वक्तृत्त्वासाठी प्रोत्साहित करण्यात यावे. जास्तीत जास्त संधी उपलब्ध करुन द्याव्या. कमीत कमी दोन ओळी तरी त्यांनी बोलण्याचे किंवा गाणे म्हणण्यासाठी आत्मविश्वास वाढवावा.

**सौ. पूजा कुंटे, चाळीसगाव**

---

आज दि. १२/२/२०२० रोजी गुरुकुल ट्रस्ट संचलीत गुरुकुल बालमंदिर चाळीसगावला भेट दिली असता सदर शाळेच्या मुख्याध्यापक सर्व सहशिक्षकांनी कला प्रदर्शनाचे उत्कृष्ट असे प्रदर्शन सादर केले प्रदर्शनाची संकल्पना उत्तम असून त्याद्वारे मुलांच्या कलाविष्कार वृद्धींगत होवून त्यांना कलेची गोडी निर्माण होण्यास प्रोत्साहन मिळेल सदरचा कार्यक्रम हा उल्लेखनिय असून स्तुत्य उपक्रम आहे.

**श्री. सुभाष गोविंद शिंपी,**
**माजी मुख्याध्यापक, मु. पो. कोन, ता. कल्याण**

---

गुरुकुल बालविकास मंदिराबद्दलचा अभिप्राय लिहितांना सांगावेसे वाटते की, मुळातच आमचे पूर्ण कुटुंब मराठी माध्यम बोलणारे आणि आपल्या पाल्याला आपण इंग्लिश मेडियमच्या शाळेत घातल्यानंतर त्याच्या सर्व भाषांचा गोंधळ होतो. त्याउलट आपल्या शाळेत बाळांच्या बुद्धीमत्तेनुसार, मानसशास्त्रावर आधारीत व उत्कृष्ट शिक्षिका व कर्मचारी वृंद यामुळे बाळाला भाषा समजते व संस्कार देखील चांगले होत असल्याचा प्रत्यक्ष अनुभव आला. वेळेचे महत्त्व कळाले. शिस्त कळाली, थोडक्यात म्हणजे माझ्या बालपणीची शाळा व शिक्षकवृंद आठवले.

धन्यवाद...!

**श्री. योगेश एकनाथ निकम,**
**चाळीसगाव**